कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
30 Aug 2025 - Page 3

# डिजिटल जगतात सायबर सुरक्षिततेसाठी उपक्रम

मुंबई : पाटकर वर्दे महाविद्यालयाच्या 'क्विक हील फाउंडेशन क्लब' तर्फे मालाड पश्चिम येथील नागिंददास खंडवाला महाविद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे संयोजन सायबर वॉरियर्स अथर्व पारकर, मानसी शेट्ये, प्रणय सिरसाट, आदित्य मूलभारती, रश्मीन शेख, मानसी शर्मा यांनी केले.



सत्राची सुरुवात विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या कथेमधून झाली. त्यानंतर तज्ज्ञांनी सायबर गुन्ह्यांचे प्रकार, डार्क वेबची माहिती तसेच HTTP व HTTPS मधील फरक स्पष्ट केला. सुरक्षित पासवर्ड निर्मिती, द्वि-चरण प्रमाणीकरणाचा वापर आणि ऑनलाईन दक्षतेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.शिकण्याची प्रक्रिया अधिक उत्साही करण्यासाठी खेळ, सहभागात्मक उपक्रम तसेच सोशल मिडिया व्यसनावर चर्चासत्र घेण्यात आले. समारोपात विद्यार्थ्यांना पालक हेच ऑनलाईन आणि ऑफलाईन जीवनातील पहिले संरक्षक असल्याचे भान देण्यात आले. या सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी नागिंददास खंडवाला महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुजा जॉन यांच्या पाठिंब्याबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा जाणीव रुजविण्याच्या दिशेने हे सत्र एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.